# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २५/०२/२०२२ (शुक्रवार)**

**(सायंकाळ)**

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. काटोल** :— दिनांक ०३/०३/२०२० चे १३.३२ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे अप. क्र. १८०/२०२० कलम ३५३, ३५४, ३३२, २९४, ५०६ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०३/०३/२०२० चे १३.३२ वा. दरम्यान वय ३८ वर्ष पिडीत/फिर्यादी ही एस.टी महामंडळ येथे कार्यरत असून ती आपले कर्तव्यावर हजर असतांना आरोपी नामे— रमेश शंकर ढोके, वय ६८ वर्ष, रा. काटोल याने टिकिट चे पैश्यावरून वादविवाद करून तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. यानंतर आरोपीने तिला शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. आरोपीला दिनांक ०२/०९/२०२० चे १४.२१ वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री. आकाश शाही, पो.स्टे. काटोल यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनाक २५/०२/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. पावसकर, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३५३, ३३२, ३५४, ३५४(अ) भादंवि. मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व प्रत्येक कलमान्वये २५००/—रु. दंड एकुण १०,०००/—रू. दंड व न भरल्यास ३ महिने सश्रम कारावास व कलम २९४ भादंवि मध्ये ३ महिने सश्रम कारावास व १०००/—रु. दंड व दंड न भरल्यास १० दिवस सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. शेख यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाजे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, श्री. सुनिल डोंगरे, पोहवा श्री. मनोज तिवारी, पोलिस शिपाई श्री. हीमांशु वंजारी यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**